26 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ज्ञानेश्वर मुळे : गडहिंग्लज येथे नागरी सत्कार; तरुणांना स्पर्धा परीक्षाबाबत दिला कानमंत्र

# देशातही करिअरला मोठी संधी

मजिद किल्लेदार

**गडहिंग्लज :** मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीतून ब्रिटीश राजवटीसाठी कारकून तयार झाले. त्याप्रमाणेच आता 'आयटी'तून हायटेक क्लार्क तयार करुन देशातील बुद्धीवंत युवकांना परदेशात पाठविण्याचा नवीन धंदा सुरु झाला आहे. मात्र, राजकारणासह देशातील सर्वच क्षेत्रात 'करिअर'ला मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे वेगळ्या वाटा धुंडाळा आणि आवडीच्या क्षेत्रात करिअर करा, असा कानमंत्र परराष्ट्र खात्यातील सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी तरुणांना आज (शनिवारी) दिला.

मारुतराव रेडेकर आणि येथील गणित- विज्ञान अध्यापक संघटनेतर्फे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठातर्फे डी. लिट पदवी मिळालेबद्दल मुळे यांचा नागरी सत्कार झाला. याप्रसंगी स्पर्धा परीक्षा, जीवनात यशस्वी होण्याचा महामार्ग या विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.




गडहिंग्लज येथे डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा सत्कार कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तुषार रेडेकर, राजेंद्र मांडेकर, डी. आर. मोरे, मारुतराव रेडेकर, डॉ. व्ही. एन. शिंदे, बाळासाहेब मुल्ला, डॉ. रेडेकर आदी उपस्थित होते.

डॉ. मुळे म्हणाले, आपला जन्म जरी सामान्य कुटुंबात झाला असला तरी आई-वडील आणि परिस्थिती असामान्य होती. त्यामुळेच आपणही असामान्य बनलो. आपल्या जडणघडणीत गावकरी व शिक्षक यांचा मोठा वाटा आहे. आपण ज्या-ज्या ठिकाणी, क्षेत्रात काम केले त्याठिकाणी नावीन्याचा शोध घेतला. त्यामुळेच आपली कामगिरी वेगळी ठरली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, केवळ स्पर्धा परीक्षा हाच यशाचा एकमेव महामार्ग नाही. पाऊलवाटा आणि रानवाटेवरुनही जीवनात यशस्वी होता येतं. त्यामुळे युवकांनी याकडे दुर्लक्ष करु नये.

डॉ. मुळे यांचा कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते अशोकस्तंभाची प्रतिकृती, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार झाला. उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डीवाय.एस.पी.पदी निवड झाल्याबद्दल सुरेश पाटील यांचा, तर सेल्स टॅक्सच्या असि. कमिशनपदी निवडीबद्दल बाळकृष्ण खणदाळे यांचा आणि गरीब मुलांना शिक्षणासाठी मदत करणाऱ्या प्रा. डॉ. नागेश मासाळ यांचा विशेष सत्कार झाला. आदिती मोती हिने मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास ॲड. श्रीपतराव शिंदे, प्रा. किसनराव कुराडे, प्राचार्य जे. बी. बारदेस्कर, प्राचार्य मंगलकुमार पाटील, राजेंद्र गड्यान्नावर, कॉ. संपत देसाई, तुषार रेडेकर, प्रा. सुनील शिंत्रे आदी उपस्थित होते.

सत्कार समितीचे अध्यक्ष रेडेकर यांनी प्रास्ताविक केले. बाळासाहेब मुल्ला यांनी सूत्रसंचलन केले. राजेंद्र मांडेकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

26 MAR 2017 पुण्यनगरी जनसंपर्क अधिकारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लक्ष्मीसेन महास्वामींकडून विद्यापीठास लाखाचा निधी

कोल्हापूर / प्रतिनिधी :

जैन मठाचे प्रमुख डॉ. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी एक लाख रुपयांचा विश्‍वस्त निधी प्रदान केला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या निधीच्या धनादेशाचा स्वीकार केला.



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे एक लाख रुपयांचा निधी प्रदान करताना डॉ. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिक्षणाप्रती अत्यंत सजग असणाऱ्या महास्वामींनी स्वतः पीएच.डी. करण्याइतकी तळमळ दर्शवली आहे. ही बाब सर्वच विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आदर्शवत आहे. त्यामुळे त्यांच्याकडून विद्यापीठास निधी प्रदान करण्यात आला, हा विद्यापीठाचा सन्मान आहे. या निधीचा विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सदुपयोग करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, भगवान महावीर अध्यासनाच्या संचालक डॉ. पद्मजा पाटील, प्रा. डी. बी. खणे, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, प्राचार्य राजेंद्र लोखंडे यांच्यासह जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

26 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करिअरमध्ये समाज बदलण्याची संधी शोधा

## परराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे यांचे प्रतिपादन; गडहिंग्लजला डॉ. मुळे यांचा नागरी सत्कार

प्रतिनिधी
गडहिंग्लज

वेगळ्या पद्धतीने जीवनाकडे बघायला शिका, 'स्पर्धा परीक्षा म्हणजेच करिअर,' हे मनातील वाक्य पुसून टाका. जेथे समस्या तेथे करिअरची संधी असते, असे सांगत, 'करिअर म्हणजे समाज व जीवन बदलण्याची संधी असते, ती साधली पाहिजे,' असे प्रतिपादन परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

डॉ. मुळे यांना मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाची डी.लीट. पदवी मिळाल्याबद्दल गडहिंग्लजकरांच्या वतीने त्यांचा शनिवारी सायंकाळी मराठा चित्रमंदिर येथे नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते; तर शिवाजी विद्यापीठाचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची विशेष उपस्थिती होती. सत्कार समितीचे अध्यक्ष एम. आर. रेडेकर यांनी स्वागत, तर बाळासाहेब मुल्ला यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर श्री. मुळे यांचा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी एमपीएससीत यश मिळवलेल्या सुरेश पाटील, बाळकृष्ण खणदाळे यांचा श्री. मुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. एम. बी. मासाळ यांचाही सत्कार झाला. अशोक भोईटे, आदिती मोर्ती यांनी मनोगत व्यक्त केले.




**गडहिंग्लज : परराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. यावेळी डावीकडून डॉ. डी. आर. मोरे, एम. आर. रेडेकर, डॉ. व्ही. एन. शिंदे, बाळासाहेब मुल्ला.**

दीड तासाच्या भाषणात श्री. मुळे यांनी शालेय जीवनापासून परराष्ट्र सचिवपदापर्यंतचा प्रवास ओघवत्या शैलीत सांगितला. विद्यार्थ्यांनी जे जगात सौंदर्य संपन्न बनवते, त्या दिशेने मार्गक्रम करावा आणि त्यातून आनंद मिळवावा. जीवन हेच अथांग पुस्तक असून ते वाचायला शिकले पाहिजे. आपली क्षमता वाढवली तर यश आपल्याकडे येते, असे ते म्हणाले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी, यशस्वी होण्यासाठी क्षमता तपासून वाटचाल केल्यास ध्येयापर्यंत पोचता येते, असे सांगितले. आभार राजेंद्र मांडेकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.